# एमएमआरसीएलने केली ९ हजार झाडांची लागवड

## गोरेगाव इनॉर्बिट मॉलजवळ राबवणार उपक्रम

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गिकेचे कार्यचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने वृक्षारोपण उपक्रम सुरू केला असून, मुंबईत ९ हजार झाडांची लागवड मियावाकी पद्धतीने करण्याचे स्पष्ट केले आहे. एमएमआरसीएल आणि फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

गोरेगाव परिसरातील इनॉर्बिट मॉलजवळ सुमारे ३ हजार चौमी भूखंडावर ९ हजार झाडांचे रोपण करण्यात येणार आहे. यात रोपांमध्ये स्थानिक प्रजातींच्या काथ, कडुलिंब, आवळा, बकुळ, सीता अशोक, चिंच, अर्जून, बदाम, शिसव, नारळ, आंबा, सुपारी, कांचन बेल याची लागवड केली जाणार आहे.

अत्यल्प कालावधीत घनदाट वननिर्मिती करण्याचा मानस असल्याचे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी सांगितले.. पुढील जागतिक पर्यावरण दिनापर्यंत झाडांचे पूर्णतः विकसित वनात रूपांतर होणे अपेक्षित आहे. ९ हजार विविध स्थानिक प्रजातींच्या झाडांचे रोप पुढील तीन महिन्यांत करण्यात येणार असून, वनविकास विभागाकडून पुढील दोन वर्ष झाडांचे संवर्धन करण्यात येणार आहे. यावेळेस वनविकास विभागाचे व एमएमआरसीएलचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.